ISSN
(Print) 2320 – 6446, (Online) 2320 – 8341

# भारतीय समाजव्यवस्थेतील स्त्रीचे स्थान

**प्रा.डॉ.सौ.कांचन नलावडे.**
मराठी विभाग,
छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा.

**प्रस्तावना**

भारतीय समाज व्यवस्थेतील स्त्रीने 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हति' यातून बाहेर पडून नव्या युगाची आस धरली. 'जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाते उद्धारी' या उक्तीप्रमाणे स्त्रियांनी आज जागतिकीकरणाच्या व्यवस्थेत स्वत:चे एक अढळ स्थान निर्माण केले आहे. समाजव्यवस्था, राज्यव्यवस्था, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरांवर स्त्रीने आज नवा ठसा उमटवला आहे.कालची असणारी पायवाट तिने राजमार्गात बदलली आहे. असे असले तरीही स्त्रियांच्या जीवनातील सर्वच प्रश्न, समस्या संपलेल्या नाहीत हे ही येथे नमूद करावेसे वाटते.

**प्राचीन काळातील स्त्रियांची स्थिती**

प्राचीन कालखंडाच्या सुरूवातीच्या काळात पुरूषप्रधान समाजव्यवस्था होती. तरीही स्त्रियांना पुरूषांच्या बरोबरीने स्वातंत्र्य होते. स्वत:चा विकास करण्यासाठी अधिकार होते. स्त्रियांना वेदाध्ययनाचाही अधिकार होता. विश्वतारा, ऊपाला, लोपामुद्रा, शची, सुलभा, गार्गी, मैत्रेयी या विदुषींनी स्वतंत्रपणे .ऋचांचीही रचना केली होती. वेद, ब्राम्हणे व उपनिषदे यांचे अध्ययन त्याकाळात पुरूषांप्रमाणे स्त्रियाही करीत असत. उत्तर वैदिक कालखंडात मात्र स्त्रियांच्या अधिकारात घट होऊन त्यांच्या स्वातंत्र्यावर मर्यादा येऊ लागल्या. अर्थोत्पादन, मालमत्ता व संरक्षण यामध्ये प्रामुख्याने पुत्राचे महत्त्व वाढत गेले आणि स्त्रियांचे महत्त्व हळूहळू कमी होऊ लागले. हुंडा देण्याची प्रथा याच काळात सुरू झाली आणि स्त्रियांचे परावलंबन वाढत गेले.

यानंतरचा प्रारंभित स्मृतिकालही स्त्रियांच्या जीवनातील संक्रमणाचा काळ ठरला. स्त्रियांचे सर्व अधिकार कमी होऊ लागले. मनुस्मृतीच्या कालखंडात स्त्री ही पुरूषाची मालमत्ता आहे. ही जाणीव अधिक तीव्र झाली. तत्कालीन स्त्रियांच्या शैक्षणिक, सामाजिक, राजकीय व धार्मिक अधोगतीला मनुस्मृतीने अधिक हातभार लावला. मनूच्या 'न स्त्री स्वातंत्र्य मर्हति' या वचनापासून 'यत्र नार्यस्त पूजन्ते रमन्त तत्र देवता' या विचारापर्यंतची वाटचाल खूपच महत्त्वाची आहे. परंतु दुर्दैवाने स्त्रीयांच्यावर याच काळात अनेक बंधने लादली जाऊ लागली. या अन्यायकारक बंधनाबद्दल प्रा.ए.वाय.कोंडेकर म्हणतात, "जन्मापासून ती दास्यत्वाच्या अंधारातून वाट काढीत चालली आहे. मृत्यूपर्यंत स्त्रीच्या जीवनाचे नियंत्रण पुरूषांनी निर्माण केलेल्या रूढींनी, नियमांनी नियंत्रित होऊ लागले. स्त्री पुरूषाची दासी बनली. शिक्षणाचा अधिकार गमावलेली अशी स्त्री मुकाटपणे अन्यायकारक रूढींना प्रतिकाराशिवाय सामोरे जाऊ लागली."[१] यावरून असे लक्षात येते की, हे स्त्रियांच्या जीवनातील अंधारयुगच होते.

**स्त्रियांच्या जीवनातील परिवर्तनाची पहाट**

१९व्या शतकात सर्वत्र अज्ञानाचे, अनाचाराचे, विषमतेचे, धर्मरूढींचे साम्राज्य पसरलेले होते. सामाजिक आणि धार्मिक परिस्थिती तर खूपच खालावलेली होती. पुरूषप्रधान समाजरचनेत स्त्रीचे स्वतंत्र अस्तित्वच साफ नाकारण्यात आले होते. स्त्रीसुद्धा माणूस आहे. तिला मन, भावना, विचार करण्याची शक्ती आहे हे नाकारून स्त्री जन्मच अशुभ मानला जात होता. स्त्रिया ही प्रदीर्घ काळ होत आलेल्या अन्यायामुळे आपले सत्व व स्वत्वच गमावून बसल्या होत्या. गुलाम म्हणून आश्रितासारखे व परावलंबी जीवन जगणे त्यांच्या अंगवळणी पडून गेले होते. समाज व्यवस्थेत स्त्रीचे स्थान कोणत्या प्रकारचे होते. याबद्दल डॉ.मा.गो.माळी लिहितात, "अगदी प्राचीन काळच्या आरंभापासून स्त्री समाजाचे सर्व प्रकारचे अस्तित्व हिरावून घेऊन गरीब गाय, पायाची दासी, अडीअडचणीच्यावेळी सोन्यानाण्यासारखी उपयोगी पडणारी व देता घेता येण्यासारखी एक वस्तू असा सोयीस्कर विचार आणि आचार अगदी आजपर्यंत होत आला आहे."[२] ही वस्तुस्थिती लक्षात घेता स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोण लक्षात येतो. सामाजिक चालीरीती, रूढी व परंपरेने बालविवाह, केशवपन, सतीची चाल अशी अनेक बंधने स्त्रियांवर लादली गेली होती. स्त्रियांवरील बंधनाबद्दल, शिक्षणव्यवस्थेबद्दल प्रेमा गोरे यांनी मांडलेले विचार अतिशय बोलके आहेत. "शिक्षण म्हणजे सारासार विचार, प्रत्येक सिद्धांत अनुभवाच्या कसोटीवर घासून पाहणे. प्रत्येक प्रस्थापित सिद्धांताकडे शंकेखोरपणे पाहून बुद्धीच्या कसोटीला तो उतरल्यासच स्वीकारणे हा विचारच समाजात नव्हता. केवळ धर्मग्रंथांचे पतण, त्यातल्या खऱ्या –खोटया भाकडकथांचे विवेचन एवढाच शिक्षणाचा अर्थ सीमित झाला होता."[३] यावरून असे लक्षात येते की, स्त्रियांना शिक्षणाची द्वारे खुली नव्हती. स्वतंत्र विचार अंमलात आणण्याची कोणतीच

व्यवस्था निर्माण झालेली नव्हती. त्यामुळे बहुजन समाजात अंधाराचे साम्राज्यच दिसून येत होते. नियतकालिकांच्या माध्यमातून प्रबोधनाचा प्रयत्न सुरू असण्याच्या काळात बहुसंख्य उपेक्षित राहिले होते. फुले म्हणतात त्याप्रमाणे

“विदयेविना मती गेली, मती विना नीति गेली
नीति विना गति गेली, गतीविना वित्त गेले
वित्ताविना शुद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले ”

हे वर्णन त्या सामाजिक परिस्थितीचे प्रकट दर्शन घडविणारे आहे. याच कालखंडात पेशव्यांची राजवट संपुष्टात आली आणि इंग्रजांची राजवट सुरू झाली. इंग्रजांच्या साम्राज्यामध्ये ज्ञानाचा धूसर प्रकाश दिसू लागला. इंग्रजांनी भारतातील जनतेसाठी काही सुधारणा आणल्या. त्यामध्ये शिक्षणाची सुधारणाही होती. तेव्हा सरकारी शाळांबरोबरच मिशनरी शाळांचेही शिक्षणाचे कार्य सुरू झाले होते. अनेक समाजसुधारकांनी बाळशास्त्री जांभेकर, आगरकर, गोपाळराव हरि देशमुख, भाऊ महाजन यांनी याच शाळातून शिक्षण घेऊन आपल्या समाजातील दोषांवर प्रखर हल्ले चढविले व समाजसुधारणेसाठी प्रयत्न केले.

शिक्षण सर्व सुधारणांचा पाया आहे. समाज परिवर्तनाचे साधन आहे. शिक्षणामुळेच समाजाचा विकास साधता येतो म्हणून स्त्रियांमध्ये शिक्षणातून सर्वप्रथम सुधारणा घडवून आणली पाहिजे असा विचार समाजसुधारकांनी पुढे आणला. समाजसुधारकांच्या प्रयत्नामुळेच स्त्रीविषयक कायदे करण्यात आले. त्यामध्ये प्रामुख्याने सतीबंदी कायदा, विधवा पुनर्विवाहाच्या पुरस्काराचा कायदा, बालविवाह बंदी कायदा यांचा विशेष उल्लेख करावा लागेल. कायद्याच्या आधारामुळे स्त्रियांची एक वेगळीच ओळख समाजासमोर आली.

महात्मा फुले, राजा राममोहन रॉय, राजर्षी शाहू, महर्षी शिंदे, धोंडो केशव कर्वे, कर्मवीर भाऊराव पाटील इ. मातब्बर मंडळींनी महाराष्ट्राच्या शिक्षण क्षेत्रात भरीव कामगिरी केली. त्याचबरोबर पंडिता रमाबाई, डॉ.आनंदीबाई जोशी, रमाबाई रानडे यांच्या रूपाने स्त्रीशिक्षणाच्या कार्याला चालना मिळाली. स्त्री शिक्षणाची चळवळ ही समाजाच्या विकासासाठी अत्यंत उपयुक्त ठरली. आजच्या विज्ञानयुगातील स्त्रीशिक्षणाचा तिच्या बुद्धिमत्तेच्या वापराचा विचार करताना गीता साने म्हणतात, “स्त्रियांच्या बुद्धीला विकासाच्या संधी न मिळाल्यास बुद्धी कोळपते आणी ती बुद्धीमतांच्या एवढया मोठया गटाला समाज मुकतो. समाजाच्या कल्याणाच्यादृष्टीने ही हानी फार मोठी आहे. कारण त्यामुळे विज्ञान विकासाचे क्षेत्र व गती दोन्ही संकुचित होऊन अर्ध्यावर येतात.ही हानी टाळण्यासाठी स्त्रीच्या बुद्धीला उमलण्याच्या सर्व संधी देणे ही विज्ञान युगाची गरज आहे.”[४] आजच्या युगातही स्त्रियांच्या बुद्धी, विकास आणि क्षमतेचा विकास आवश्यक आहे हे यावरून लक्षात येते.

**स्त्रियांच्या कल्याण व सुरक्षिततेच्यादृष्टीने कायदे**

स्वातंत्र्यपूर्व व स्वातंत्र्योत्तर काळात स्त्रियांच्या कल्याणाच्या व सुरक्षिततेच्या दृष्टीने अनेक कायदे झाले या कायद्यांमुळे महिलांच्या सामाजिक, कौटुंबिक जीवनात बरेच परिवर्तन झाले. यासाठी झालेल्या महत्त्वाच्या कायद्यांमुळे महिलांचे अत्याचार थांबवण्यास पाठबळ मिळाले. अशा कायद्यांची मदत परिवर्तनवादी चळवळीला झाली आहे.

१९६५ नंतर संपूर्ण जगभर स्त्रीमुक्ती चळवळीची लाट पसरली. १९७५या आंतरराष्ट्रीय स्त्री वर्षानंतर भारतात व महाराष्ट्रात या चळवळीचा प्रसार होऊ लागला. १९७७—८० मध्ये महाराष्ट्रात स्त्रीमुक्ती यात्रा काढण्यात आली. सुरूवातीला ती पुणे, मुंबई यासारख्या शहरातील निलम गोऱ्हे, छाया दातार, ज्योती म्हापसेकर यासारख्या मध्यमवर्गीय कार्यकर्त्यामार्फत चालवली गेली. या कार्यकर्त्यांनी पोस्टर प्रदर्शन, चर्चासत्र, परिसंवाद यांच्या सहाय्याने सारा महाराष्ट्र ढवळून काढला. आज आपला देश एका गुंतागुतींच्या परिस्थितीतून जात आहे. आजही परितक्त्या स्त्रिया, अपंग स्त्रिया, नोकरी करणाऱ्या स्त्रिया, स्त्रीभ्रूण हत्या यासारखे स्त्रियांच्या जीवनातील प्रश्न संपलेले नाहीत. यादृष्टीने प्रयत्न होणे गरजेचे आहे.

**संदर्भ**

१) कोंडेकर प्रा.ए.वाय—भारतीय समाजाची संरचना व परिवर्तन, फडके प्रकाशन, कोल्हापूर, प्रथमावृत्ती, जुलै २००४.
२) माळी डॉ.मा.गो.—‘क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले’,आशा प्रकाशन, गारगोटी, द्वितीयावृत्ती, ३ एप्रिल १९८१, पृ. २
३) गोरे प्रेमा —‘थोर समाजसेविका सावित्रीबाई फुले’ सत्यशोधक छत्रपती ज्ञानपीठ, धुळे, प्रथमावृत्ती, ऑक्टोंबर २००३, पृ. २९